महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

जावक क्रमांक – ४०५१/५९ दिनांक :- १० ऑक्टोबर, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

# म्हाडा कोंकण मंडळाच्या विरार बोळिंज वसाहतीतील ९४०९ सदनिकाधारकांच्या मासिक सेवा शुल्कात कपात

## अल्प उत्पन्न गटातील सदनिकाधारकांकडून आता १४५० रुपये प्रतिमाह व मध्यम उत्पन्न गटातील सदनिकाधारकांकडून २४०० रुपये प्रतिमाह सेवाशुल्क आकारले जाणार

मुंबई, दि. १० ऑक्टोबर, २०२४ :- म्हाडा कोंकण मंडळाच्या विरार बोळींज वसाहतीतील टप्पा क्रमांक १,२ व ३ मधील अल्प, मध्यम उत्पन्न गटातील ९४०९ सदनिकाधारकांकडून आकारण्यात येणारे मासिक सेवाशुल्क कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सेवाशुल्क कमी करण्याबाबत वसाहतीतील रहिवाशांकडून व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून वारंवार मागणी करण्यात येत होती. त्याबाबत गृहनिर्माण मंत्री श्री. अतुल सावे व म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या संयुक्त बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सदर प्रकल्पामध्ये आजतागायत प्रत्यक्ष ताबा घेतलेल्या व यापुढे ताबा घेणाऱ्या सर्व सदनिकाधारकांचे यापूर्वीचे सेवाशुल्क कमी करण्यात आले आहे. या निर्णयानुसार विरार बोळींज वसाहतीतील टप्पा क्रमांक एक, दोन व तीन मधील अल्प उत्पन्न गटातील सदनिकाधारकांकडून १४५० रुपये प्रतिमाह व मध्यम उत्पन्न गटातील सदनिकाधारकांकडून २४०० रुपये प्रतिमाह सेवाशुल्क आकारले जाणार आहे. पूर्वी अल्प उत्पन्न गटातील सदनिकाधारकांकडून २१२१ रुपये प्रतिमाह व मध्यम उत्पन्न गटातील सदनिका धारकांकडून ३४९३ रुपये प्रतिमाह सेवाशुल्क आकारण्यात येत होते.

तसेच कोविड-१९ (मार्च २०२० ते मार्च २०२२ या दोन वर्षाच्या कालावधीकरिता) या वसाहतीतील सदनिका धारकांना सूट दिलेल्या सेवाशुल्कावर अतिरिक्त ५० टक्के सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

थकीत असलेल्या सेवाशुल्कावरील आकारण्यात येणारे विलंब शुल्क माफ करण्यात येत असून मूळ सेवाशुल्क भरण्याकरिता मार्च २०२५ पर्यंत मुभाही देण्यात आली आहे. तसेच एप्रिल २०२५ पासून वार्षिक १८ टक्के दराने आकारण्यात येणारे विलंब शुल्क आता वार्षिक १२ टक्के दराने आकारण्यात येणार आहे.

ज्या सदनिकाधारकांनी अद्यापपर्यंत सेवा शुल्काचा भरणा केलेला आहे, त्या सदनिकाधारकांच्या सेवाशुल्कातील फरकाची रक्कम पुढील सेवा सेवाशुल्कामध्ये समायोजित करण्यात येणार आहे, अशी माहिती कोंकण मंडळाच्या मुख्य अधिकारी श्रीमती रेवती गायकर यांनी दिली.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

Outward No. : 4051/59 Dt. 10th October, 2024

**Press Release**

# MHADA Reduces Monthly Maintenance Charges for 9,409 Unit Owners in Virar Bolinj Colony

## Low-Income Group unit owners to now pay ₹1,450 per month, and Middle-Income Group unit owners to pay ₹ 2,400 per month in maintenance fees

Mumbai, 10 October, 2024: The Konkan Housing and Area Development Board of MHADA has announced a reduction in monthly maintenance charges for 9,409 unit owners in Phases 1, 2, and 3 of the Virar Bolinj Colony under the Low-Income Group (LIG) and Middle-Income Group (MIG) categories.

This decision follows repeated requests from both residents and local representatives to reduce the maintenance fees. In a joint meeting between Housing Minister Mr. Atul Save and MHADA Vice President & CEO Mr Sanjeev Jaiswal, it was decided to reduce the monthly maintenance charges for all unit owners who have taken possession, as well as for those who will be taking possession in the near future.

Under the revised structure, Low-Income Group (LIG) unit owners will now pay ₹1,450 per month, while Middle-Income Group (MIG) unit owners will pay ₹2,400 per month. This marks a significant reduction from the previous fees of ₹2,121 per month for LIG unit owners and ₹3,493 per month for MIG unit owners.

In addition to this, an extra 50% discount will be applied to the already reduced maintenance charges for the period during COVID-19 (March 2020 to March 2022), providing further relief to the unit owners in the colony.

Furthermore, any outstanding dues related to delayed payments will have the late fee completely waived, and unit owners will have until March 2025 to clear their basic maintenance dues. From April 2025 onward, the interest rate on delayed payments will be reduced from 18% to 12% per annum.

For unit owners who have already paid their maintenance charges in full, the difference in fees due to this reduction will be automatically adjusted in future payments. This information was shared by Smt. Revati Gaikar, Chief Officer of the Konkan Board.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA